ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 05 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## इंडिया आघाडीत फूट? काँग्रेसला धक्का; 8 जूनच्या बैठकीत सहभागी न होण्याचा निर्णय




पान 3 वरुन...
बोलण्यात अडखळले अन् खुनाचे गूढ उलगडले!

### 12 ठिकाणी महायुती आणि मविआ आमने सामने

# विधानपरिषदेच्या 17 पैकी 5 जागा बिनविरोध...

**05** जागा बिनविरोध | एकूण **17** मतदारसंघ | **12** मतदारसंघांत थेट लढत


महाईन्यूज । मुंबई

**राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक राजकीय घडामोडी घडल्या. अर्ज माघारीनंतर पाच उमेदवार बिनविरोध निवडून आले असून उर्वरित १२ मतदारसंघांत थेट निवडणूक होणार आहे.**

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे बिनविरोध विजयी झाले. पुणे मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम काकडे यांचा विजय निश्चित झाला. ठाणे मतदारसंघातून शिवसेनेचे रवींद्र फाटक, यवतमाळमधून शिवसेनेचे दुष्यंत चतुर्वेदी आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदारसंघातून भाजपचे अरुण लखाणी बिनविरोध निवडून आले.

नाशिक मतदारसंघात अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी सर्वाधिक नाट्यमय घडामोडी घडल्या. भाजपचे गणेश गीते यांनी माघार घेतली, मात्र अपक्ष गोकुळ गीते यांनी उमेदवारी कायम ठेवल्याने शिवसेनेचे नरेंद्र दराडे आणि गोकुळ गीते यांच्यात थेट लढत होणार आहे.

सांगली-सातारा मतदारसंघात भाजपचे धैर्यशील कदम आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे अभयसिंह जगताप यांच्यात सामना रंगणार




आहे. नागपूर पोटनिवडणुकीत भाजपचे डॉ. राजीव पोतदार आणि काँग्रेसचे अतुल लोंढे आमनेसामने असतील. नांदेडमध्ये भाजपचे अमर राजूरकर आणि काँग्रेसचे रामदास पाटील यांच्यात लढत होणार आहे.

जळगावमध्ये भाजपचे नंदकिशोर महाजन, ठाकरे गटाचे शरद तायडे आणि शिंदे गटाच्या बंडखोर रेश्मा काळे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. अमरावतीमध्ये भाजपचे प्रवीण पोटे, काँग्रेसचे हर्षदीप देशमुख आणि वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा मैदानात आहेत.

परभणी-हिंगोली मतदारसंघात शिवसेनेचे सईद खान, ठाकरे गटाचे डॉ. विवेक नावंदर आणि अपक्ष सुशील देशमुख यांच्यात तिरंगी लढत रंगणार आहे. धाराशिव-लातूर-बीडमध्ये भाजपचे बसवराज पाटील आणि काँग्रेसचे महेश देशमुख यांच्यात थेट सामना होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात भाजपचे सुहास शिरसाट आणि ठाकरे गटाचे गणेश लोखंडे आमनेसामने असतील. तर सोलापूरमध्ये भाजपचे राजेंद्र राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे वसंतराव देशमुख यांच्यात लढत रंगणार आहे.

अर्ज माघारीनंतर बहुतांश मतदारसंघांत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात सरळ संघर्षाचे चित्र स्पष्ट झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांतील संख्याबळाची खरी परीक्षा आता मतदानातून होणार आहे.

### निवडणुकीचे चित्र स्पष्ट

राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांपैकी ५ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. पुणे, ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, यवतमाळ आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या मतदारसंघांतील निकाल अर्ज माघारीनंतर स्पष्ट झाले. उर्वरित १२ मतदारसंघांत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात थेट लढती रंगणार असून नाशिक, सोलापूर, नागपूर, नांदेड आणि धाराशिव-लातूर-बीड या मतदारसंघांकडे विशेष लक्ष लागले आहे.

### बिनविरोध निवडून आलेले उमेदवार


**अरुण लखाणी**
(भाजप)
वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली
बिनविरोध


**विक्रम काकडे**
(राष्ट्रवादी काँग्रेस)
पुणे
बिनविरोध


**रवींद्र फाटक**
(शिवसेना)
ठाणे
बिनविरोध


**अनिकेत तटकरे**
(राष्ट्रवादी काँग्रेस)
रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग
बिनविरोध


**दुष्यंत चतुर्वेदी**
(शिवसेना) यवतमाळ
बिनविरोध

# गर्भलिंगनिदान रॅकेटचा मोठा पर्दाफाश

## पुणे ग्रामीण पोलिसांचा धडक तपास सुरू; 12 ते 15 डॉक्टर रडारवर

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्ह्यातील गर्भलिंगनिदानाच्या बेकायदेशीर रॅकेटचा पर्दाफाश झाल्यानंतर या गुन्ह्याची व्याप्ती अपेक्षेपेक्षा मोठी असल्याचे तपासातून समोर आले आहे. मागील पाच वर्षांत हजारो महिलांचे गर्भलिंगनिदान करून बहुसंख्य गर्भपात करण्यात आल्याची माहिती उघड झाली असून, या रॅकेटची पाळेमुळे पुण्यासह तीन ते चार जिल्ह्यांपर्यंत पोहचल्याचा संशय आहे. पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत तपासाबाबतची माहिती दिली.**




केडगाव परिसरात कारवाई करीत कुख्यात आरोपी अण्णासाहेब गिरी (रा. केडगाव, ता. दौंड) आणि डॉ. अतुल अंकुश जाधव (रा. लोहगाव) यांना अटक केली आहे. तर डॉ. नरेंद्र ठाकरे, मंदार माळी आणि सुंदरम कदम यांच्याविरुद्ध गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी) कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरू आहे.

आरोग्य विभागाकडे गर्भलिंगनिदानाचा व्हिडिओ प्राप्त झाल्यानंतर डॉ. सचिन विठ्ठल गुजर यांनी यवत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानंतर सुरू झालेल्या तपासात गिरी हा गावोगावी फिरून महिलांची सोनोग्राफी करीत असल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे, तो कोणताही वैद्यकीय तज्ज्ञ नसून बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर फार्मसीचे शिक्षण अर्धवट सोडून मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून काम करीत होता. त्याच अनुभवाच्या आधारे त्याने हा बेकायदेशीर व्यवसाय सुरू केल्याचे समोर आले आहे. तपासात गिरीने अडीच वर्षांपूर्वी पोर्टेबल सोनोग्राफी मशिन नरेंद्र ठाकरेकडून घेतल्याचे उघड झाले आहे. तसेच, गर्भलिंग निदानानंतर काही महिलांना गर्भपातासाठी वाघोलीतील डॉ. अतुल जाधव यांच्या दवाखान्यात पाठविले जात असल्याची माहितीही समोर आली आहे. तपासानुसार आरोपी प्रत्येक गर्भलिंगनिदानासाठी 40 ते 60 हजार रुपये आकारत होता.

### महिलांचा शोध सुरू

आत्तापर्यंत 15 साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले असून, बँक व्यवहार, मोबाईल सीडीआर आणि इतर तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण सुरू आहे. आरोपीने मागील पाच वर्षात हजारो महिलांची गर्भलिंग चाचणी केली असण्याची शक्यता असून, संबंधित महिलांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. गर्भलिंगनिदान करून घेतलेल्या कुटुंबांची भूमिकाही तपासली जात असून, आवश्यकतेनुसार त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते. मुख्य आरोपी गिरी याचा मोबाईल आणि तांत्रिक तपासातून तो 12 ते 15 डॉक्टरांच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे. त्यांच्या आर्थिक व्यवहारांसह या रॅकेटमधील भूमिकेची चौकशी सुरू आहे.

> गर्भलिंगनिदान करणाऱ्याला अटक केली असून, त्याच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. तांत्रिक तपासात 12 ते 15 डॉक्टरांच्या संपर्काचे धागेदोरे समोर आले आहेत. या संपूर्ण रॅकेटची पाळेमुळे शोधून काढण्यासाठी तपासाला गती देण्यात आली आहे. तपासादरम्यान संशयितांच्या आर्थिक व्यवहारांचीही सखोल चौकशी सुरू असून, अनेक महत्वाची कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे पोलिसांच्या हाती लागले आहेत.
>
> - संदीपसिंग गिल्ल, पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण

# पुणे विधानपरिषदेत विक्रम काकडे यांची बिनविरोध एंट्री

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विक्रम काकडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी गुरुवारी (४ जून) सर्व प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्याने काकडे यांचाच एकमेव अर्ज शिल्लक राहिला आहे.**

निवडणूक प्रक्रियेनुसार अधिकृत घोषणा २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार असली, तरी काकडे यांच्या विजयावर आता शिक्कामोर्तब झाल्याचे मानले जात आहे.

महायुतीच्या जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आला होता. त्यामुळे पक्षाने विक्रम काकडे यांना उमेदवारी दिली होती. दुसरीकडे, महाविकास आघाडीच्या जागावाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाला देण्यात आली होती. त्यानुसार श्रीकांत पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांनी अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली होती.

मात्र, महायुतीचा धर्म पाळत प्रदीप कंद यांनी अखेर आपला अर्ज मागे घेतला. तर महाविकास आघाडीच्या मतदारांची संख्या तुलनेने कमी असल्याने श्रीकांत पाटील यांनीही माघार घेतल्याचा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे. त्यांच्या माघारीनंतर निवडणुकीतील चुरस संपुष्टात आली.

याशिवाय माजी आमदार सुनील टिंगरे, तुषार कामठे आणि सुनील जरे या अपक्ष उमेदवारांनीदेखील आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात केवळ विक्रम काकडे यांचाच उमेदवारी अर्ज शिल्लक राहिला.



### एंट्री केवळ औपचारिकते-पुरतीच

उमेदवारी अर्ज माघारीनंतर पाच उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतल्याची अधिकृत घोषणा प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी गजानन पाटील यांनी केली. या घडामोडीनंतर पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध पार पडण्याचा मार्ग मोकळा झाला असून, विक्रम काकडे यांची विधानपरिषदेतील एंट्री आता केवळ औपचारिकतेपुरतीच बाकी राहिली आहे.

# बोलण्यात अडखळले अन् खुनाचे गूढ उलगडले!

## मोशीतील अज्ञात मृतदेह प्रकरणाचा गुन्हे शाखेने केला छडा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी परिसरातील मैदानात एकाचा दगडाने ठेचून खून झाल्याचे उघडकीस आले. मृताची ओळख नव्हती, घटनास्थळी ठोस पुरावा नव्हता आणि तपासाला दिशा देईल असा धागादोराही नव्हता. मात्र, पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज, खबऱ्यांचे जाळे आणि संशयितांच्या बोलण्यातील विसंगती यांचा आधार घेत गूढ उलगडले. चौकशीदरम्यान दोन मित्र अडखळले आणि त्याच क्षणी पोलिसांच्या संशयाला बळ मिळाले. त्यानंतर संपूर्ण कट उघडकीस आला.**

मोशी परिसरातील मोकळ्या जागेत १२ जून २०२३ रोजी एकाचा मृतदेह आढळून आला होता. दगडाने ठेचून खून करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले. मात्र, त्याची ओळख पटत नसल्याने तपासात अडथळे निर्माण झाले होते. घटनास्थळी सापडलेल्या साहित्यावरून तो भंगार गोळा करणारा असावा, असा अंदाज होता.

दरम्यान, भंगार वेचणाऱ्या व्यक्तीच्या बेपत्ता होण्याची तक्रार एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात दाखल झाली. त्या धाग्यावरून खून झालेल्याची ओळख पटली आणि तपासाला दिशा मिळाली. गुन्हे शाखेच्या पथकाने परिसरातील भंगार खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकांकडे चौकशी सुरू केली. खून झालेल्यासोबत कोण वावरत होते, त्याचे मित्र कोण होते, याची माहिती गोळा करण्यात आली. याच तपासात काही दुकानांमधील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात आले. त्यात खून झालेल्यासोबत आणखी तीन जण दिसून आले. त्यांचा शोध सुरू झाला.

> कोणताही धागादोरा नसताना खून झालेल्या व्यक्तीच्या मित्रांकडून माहिती मिळविण्यासाठी चौकशी सुरू केली होती. यादरम्यान त्यांच्या बोलण्यात तफावत आढळली. त्यामुळे संशय बळावला. कसून चौकशी केली असता तेच मारेकरी असल्याचे निष्पन्न झाले.
>
> **- संतोष पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक**



### खबऱ्यांनी दिली माहिती

खुनाला पाच दिवस झाले तरी हाती काही लागत नव्हते. त्यामुळे पोलिस अंमलदार प्रमोद गर्जे यांनी खबऱ्यांना कामाला लावले. दोन संशयित कुदळवाडी परिसरात येणार असल्याची माहिती दुसऱ्याच दिवशी खबऱ्यांकडून मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले.

### वाटणीवरून रक्तरंजित शेवट

चौघेही रस्त्यावर सापडणारे भंगार साहित्य गोळा करून विकत. वादळी वाऱ्यामुळे काही घरांवरील आणि दुकानांवरील पत्रे उडाले होते. ते गोळा करून चौघांनी विकले. त्यातून ७०० रुपये मिळाले. या पैशांच्या वाटणीवरून वाद झाला. त्यातून तिघांनी मित्रालाच बेदम मारहाण केली आणि दगडाने ठेचून त्याचा खून केला.

### ‘तुमचे कारनामे सीसीटीव्हीत कैद’

चौकशीदरम्यान दोघांच्या जबाबांमध्ये विसंगती आढळली. एकाच घटनेबाबत दोघे वेगवेगळी माहिती देत होते. काही प्रश्न विचारल्यानंतर ते अडखळू लागले. त्यामुळे पोलिसांनी त्यांना, ‘तुमचे कारनामे सीसीटीव्हीमध्ये कैद आहेत. त्याचे फुटेज आमच्याकडे आहे,’ असे सांगताच दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली. आणखी एका साथीदाराच्या मदतीने मित्राचाच खून केल्याचे त्यांनी मान्य केले.

---

# १,२०० कोटींच्या पवना जलवाहिनी प्रकल्पाला हिरवा कंदील

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला अखेर गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तब्बल १५ वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंडातून २५ टक्के निधी मिळण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून निधी प्राप्त होताच निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येणार आहे.**



सुरुवातीला सुमारे ४०० कोटी रुपयांचा असलेला हा प्रकल्प आता १ हजार २०० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. केंद्राकडून २५ टक्के निधी मिळणार असून उर्वरित ७५ टक्के निधी महापालिकेला स्वतः उभारावा लागणार आहे. यासाठी म्युन्सिपल बॉण्ड, ग्रीन बॉण्ड तसेच वित्तीय संस्था आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज घेण्याचा पर्याय प्रशासनाकडून विचाराधीन आहे.

निगडी-प्राधिकरण येथील जलशुद्धीकरण केंद्रापासून पवना धरणापर्यंत ३४.७१ किलोमीटर लांबीची १८०० मिमी व्यासाची समांतर भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यापैकी ४.४० किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ३०.३१ किलोमीटरचे काम बाकी आहे. प्रकल्पांतर्गत पवना धरणाजवळ जॅकवेल, पंपिंग स्टेशन आणि ब्रेक प्रेशर टाकी उभारण्यात येणार आहे. कामाचा वेग वाढविण्यासाठी प्रकल्पाचे तीन स्वतंत्र भाग करून तीन ठेकेदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

या प्रकल्पामुळे शहराला प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ पाणी उपलब्ध होणार असून पाण्याची गळती पूर्णपणे थांबविण्यास मदत होणार आहे. सध्या पवना धरणातून ५५० एमएलडी पाणी उचलले जाते. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त १०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर शहराच्या भविष्यातील पाणी गरजा पूर्ण करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, या प्रकल्पाला मावळमधील काही लोकप्रतिनिधींचा पूर्वी विरोध होता. मात्र, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी अलीकडेच मुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून प्रकल्प पूर्ण करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे प्रकल्पावरील विरोधही कमी होत असल्याचे चित्र आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी सांगितले की, पवना बंद जलवाहिनी आणि भामा आसखेड पाणी योजनेच्या माध्यमातून शहराला मोठ्या प्रमाणात स्वच्छ व सुरक्षित पाणी उपलब्ध होणार असून पाणी शुद्धीकरणावरील खर्चातही मोठी बचत होणार आहे.

> पवना बंद जलवाहिनी प्रकल्प शहरासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे शहराला स्वच्छ पाणी मिळणार आहे. प्रदूषणविरहीत पाण्यामुळे पाणी शुद्धीकरण प्रक्रियेचा खर्चात मोठी घट होणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्राच्या अर्बन चॅलेंज फंडातून 25 टक्के निधी मिळणार आहे. उर्वरित निधी महापालिका स्वत: उभा करणार आहे. तसेच, भामा आसखेड पाणी योजनेतून 167 एमएलडी पाणी बंद जलवाहिनीद्वारे उपलब्ध होणार आहे. या दोन प्रकल्पांतून शहराला मोठ्या प्रमाणात स्वच्छ पाणी मिळणार आहे.
>
> **- विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, महापालिका**

# 'माफी'चे साक्षीदार आणि महाराष्ट्राचे भविष्य



## भूमिका

**महाराष्ट्र सरकारने नुकतीच जाहीर केलेली ३६ हजार कोटी रुपयांची शेतकरी कर्जमाफी राज्याच्या आर्थिक आणि राजकीय वास्तवावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या नावाखाली अशा योजना वारंवार जाहीर केल्या जात असल्या, तरी त्यामागील दीर्घकालीन परिणामांचा विचार फारसा होताना दिसत नाही.**



विशेष म्हणजे ही राज्यातील पाचवी कर्जमाफी आहे. मागील कर्जमाफी योजनांनी शेतकऱ्यांच्या समस्यांचे कितपत निराकरण केले, याचा वस्तुनिष्ठ आढावा न घेता नव्या योजनेची घोषणा करण्यात आली आहे.

कर्जमाफी हा शेतकऱ्यांच्या संकटावरचा कायमस्वरूपी उपाय नसून तात्पुरता दिलासा आहे. शेतीमालाला हमीभाव, सिंचन सुविधा, बाजारपेठेपर्यंत पोहोच,

आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्पादन खर्चावर नियंत्रण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर उपाययोजना न झाल्यास शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकतो. त्यामुळे कर्जमाफीपेक्षा शेतीला सक्षम करणाऱ्या धोरणांची गरज अधिक आहे. याचबरोबर 'लाडकी बहीण' योजनेसाठी दरवर्षी सुमारे २६ हजार कोटी रुपये, कृषिपंपांच्या वीज बिलांसाठी २० हजार कोटी रुपये आणि आता कर्जमाफीसाठी ३६ हजार कोटी रुपये असा प्रचंड खर्च राज्यावर पडणार आहे.

या योजनांचा सामाजिक हेतू मान्य केला तरी त्यासाठी लागणाऱ्या निधीचा स्रोत आणि आर्थिक परिणाम यावर चर्चा होणे आवश्यक आहे. राज्यावर आधीच मोठ्या प्रमाणात कर्जाचा बोजा आहे. त्यावरील व्याजासाठी दरवर्षी हजारो कोटी रुपये खर्च होत असताना अशा योजनांमुळे आर्थिक ताण आणखी वाढणार आहे.

लोकशाहीत कल्याणकारी योजना आवश्यक असतात; मात्र त्या आर्थिक शिस्त आणि विकासाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असायला हव्यात. दुर्दैवाने अलीकडच्या काळात अनेक योजना या लोकहितापेक्षा मतांच्या राजकारणाशी अधिक जोडल्या गेल्याचे दिसते. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या प्रयत्नात राज्याच्या आर्थिक क्षमतेकडे दुर्लक्ष केले जाते.

परिणामी विकासासाठी आवश्यक असलेल्या शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांवरील गुंतवणूक दुय्यम ठरते. एकेकाळी उद्योग, वित्त, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रात देशाचे नेतृत्व करणारा महाराष्ट्र आज स्पर्धेत मागे पडताना दिसत आहे. नवीन गुंतवणूक, मोठे उद्योग आणि रोजगाराच्या संधी अन्य राज्यांकडे वळत आहेत.

अशा परिस्थितीत राज्याच्या भविष्यासाठी दूरदृष्टीची धोरणे अपेक्षित असताना अल्पकालीन लोकप्रियतेवर भर दिला जात आहे. शेतकरी, महिला आणि सामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे. मात्र त्यासाठी आर्थिक जबाबदारी आणि विकासाचा समतोल राखणे तितकेच महत्त्वाचे आहे.

अन्यथा 'माफी' आणि अनुदानांच्या राजकारणात राज्याची प्रगती खुंटण्याचा धोका वाढतो. नागरिकांनीही तात्कालिक लाभांपलीकडे जाऊन अशा निर्णयांच्या परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे. कारण आजच्या आर्थिक निर्णयांचा परिणाम उद्याच्या महाराष्ट्राच्या विकासावर होणार आहे.

## प्रासंगिक »

### मातृभक्ती

**सर आशुतोष मुखर्जी हे विद्वान न्यायाधीश आणि कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलपती होते. त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे इंग्रज सरकारने त्यांना इंग्लंडला पाठवण्याचे ठरवले.**

परदेशगमनाची सर्व तयारी पूर्ण झाली होती. मात्र शेवटच्या क्षणी त्यांच्या आईने काही कारणास्तव त्यांना इंग्लंडला जाऊ नये, असे सांगितले. आईची आज्ञा सर्वोच्च मानून आशुतोष मुखर्जी यांनी इंग्लंडचा प्रवास रद्द केला. त्यांनी सरकारला याबाबत कळवले. हे समजताच व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन संतापला.

त्याने मुखर्जी यांना बोलावून आईला समजावण्यास सांगितले. परंतु आशुतोष मुखर्जी ठामपणे म्हणाले, "माझ्यासाठी आईची आज्ञा सर्वश्रेष्ठ आहे. आमच्या संस्कृतीत आईला देवतेचे स्थान आहे. तिची आज्ञा मी कोणत्याही परिस्थितीत मोडू शकत नाही." त्यांच्या या मातृभक्तीने आणि निश्चयाने कर्झन प्रभावित झाला. त्याने त्यांचे कौतुक करून त्यांना प्रेमाने आलिंगन दिले.

- तात्पर्य : आई-वडिलांचा आदर आणि आज्ञापालन हेच खरे संस्कार आहेत.

गाझा पट्टीतील युद्ध दिवसेंदिवस अधिक भीषण होत चालले आहे. बॉम्बहल्ले, विस्थापन आणि जीवितहानी यांमुळे आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांसमोर आता अन्नटंचाईचे नवे संकट उभे राहिले आहे.

# इंधनदरवाढीचा गाझातील घासावर घाला



मानवतावादी मदत पुरवणाऱ्या वर्ल्ड सेंट्रल किचन या संस्थेने वाढत्या इंधनखर्चामुळे गाझातील गरम जेवणाचा पुरवठा निम्म्यावर आणण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लाखो नागरिकांच्या अन्नसुरक्षेवर गंभीर परिणाम होणार आहेत.

युद्धाच्या काळात अन्न, पाणी आणि औषधे या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे सर्वात मोठे आव्हान असते. गाझामध्ये वर्ल्ड सेंट्रल किचन गेल्या अनेक महिन्यांपासून मोठ्या प्रमाणावर गरम व पौष्टिक अन्न पुरवत आहे. हजारो स्वयंसेवक आणि कर्मचारी जीव धोक्यात घालून हे कार्य करीत आहेत. मात्र इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे आणि पुरवठा साखळीवरील ताणामुळे संस्थेला आपली सेवा मर्यादित करावी लागत आहे. ही बाब केवळ एका संस्थेची अडचण नाही. ती युद्धाच्या व्यापक परिणामांची जाणीव करून देणारी आहे.

रणांगणावर होणाऱ्या संघर्षाचा फटका थेट सामान्य नागरिकांना बसतो. रोजगार, निवारा आणि सुरक्षितता गमावलेल्या कुटुंबांसाठी अशा भोजनसेवा हा जगण्याचा आधार असतो. त्यामुळे अन्नपुरवठ्यातील कपात उपासमारीच्या संकटाला अधिक तीव्र करू शकते. वर्ल्ड सेंट्रल किचनचे संस्थापक जोस अँड्रेस यांनी आपत्तीग्रस्तांना अन्नपुरवठा करण्याच्या उद्देशाने ही संस्था सुरू केली. हैतीतील भूकंपापासून ते जगभरातील अनेक संकटांमध्ये या संस्थेने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

गाझामध्येही त्यांनी लाखो लोकांना आधार दिला. परंतु वाढती महागाई आणि इंधनदर यामुळे मानवतावादी संस्थांनाही मर्यादा येत असल्याचे या घटनेतून स्पष्ट होते. आज गरज आहे ती आंतरराष्ट्रीय समुदायाने अधिक सक्रिय भूमिका घेण्याची.

युद्धग्रस्त भागांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे, मानवतावादी संस्थांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आणि संघर्ष कमी करण्यासाठी राजनैतिक प्रयत्न वाढविणे आवश्यक आहे. अन्यथा युद्धामुळे निर्माण झालेली भूक आणि उपासमार ही आणखी मोठी मानवी शोकांतिका ठरू शकते.

युद्धाचा खरा बळी नेहमीच सामान्य नागरिक असतो. गाझातील परिस्थिती हेच वास्तव अधोरेखित करते. जगाने याकडे केवळ संघर्ष म्हणून नव्हे, तर मानवतेच्या परीक्षेच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सर्व सुख आम्ही भोगूं सर्व काळ ।
तोडियेलें जाळ मोहपाश ॥१॥

याचसाठी सांडियेले भरतार ।
रातलों या परपुरुषाशीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरे गटातून तीन बड्या नेत्यांची हकालपट्टी?

## शिंदेसेनेच्या धक्क्याने भाजपात खळबळ; शिंदेसेनेने भाजपालाच मोठा धक्का दिला

**महाईन्यूज । छत्रपती संभाजीनगर**

**राज्यात विधान परिषद निवडणुकीचा रणसंग्राम सुरू असतानाच ठाकरे गटाने तीन प्रभावशाली नेत्यांची पक्षातून तडकाफडकी हकालपट्टी केली... भाजपाच्या चार माजी नगरसेवकांसह ठाकरे गटाच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आमच्या पक्षाचा विश्वासघात केल्याची टीका पुणे काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केली...**



राज्यात विधान परिषद निवडणुकीचा रणसंग्राम सुरू असतानाच शिवसेना ठाकरे गटाने तीन प्रभावशाली नेत्यांना पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवला. छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघातून ठाकरे गटाने देवयानी डोनगावकर यांना उमेदवारी दिली होती. मात्र, त्यांनी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतल्याने भाजपाच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळेच ठाकरे गटाने देवयानी यांच्यासह त्यांचे पती कृष्णा डोनगावकर यांची पक्षातून तडकाफडकी हकालपट्टी केली. दुसरीकडे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधान परिषद मतदारसंघातून ठाकरे गटाने बाळ माने यांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु त्यांनीही निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे उद्धव ठाकरे यांनी त्यांच्यावरही मोठी कारवाई केली. या सर्व नेत्यांनी पक्षाचा आदेशाला बगल देत मनमानी केल्यामुळे त्यांना शिवसेनेतून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला, असे ठाकरे गटाच्या एका नेत्याने सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने महायुतीतील प्रमुख मित्रपक्ष असलेल्या भाजपाला मोठा धक्का दिला. डॉ. श्रीकांत शिंदे यांचा गड मानल्या जाणाऱ्या कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील भाजपाच्या चार माजी नगरसेवकांनी शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. त्याचबरोबर ठाकरे गटाच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनीही शिंदेसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला. या पक्षप्रवेशामुळे डोंबिवलीत शिंदे गटाची संघटनात्मक ताकद वाढणार असून, येणाऱ्या काळासाठी हा प्रवेश राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे. यावेळी भाजपाचे माजी नगरसेवक शैलेश धात्रक, मनीषा धात्रक, श्रीकर चौधरी आणि प्रमिला चौधरी यांनी धनुष्यबाण हाती घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. तसेच ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख योगेंद्र भोईर, केडीएमसीच्या निवृत्त सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवबंधन बांधले. या पक्षप्रवेशामुळे भाजपात मोठी खळबळ उडाल्याचे सांगितले जाते.

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने आमच्या पक्षाचा विश्वासघात केला, अशी टीका पुणे काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केली. विधान परिषदेच्या पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, त्यांनी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे येथील महायुतीच्या उमेदवाराचा विजय निश्चित मानला जात आहे. या राजकीय घडामोडीनंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी माध्यमांशी संवाद साधताना उघडपणे नाराजी बोलून दाखवली. "आमच्या सोबत धोका झाला असून शरद पवार गटाने काँग्रेसचा विश्वासघात केला आहे. पुणे विधान परिषदेसाठी महाविकास आघाडीची लढण्याची तयारी होती, काँग्रेस पक्षाचा आकडा सगळ्यात मोठा होता, मात्र या जागेसाठी शरद पवार साहेबांच्या पक्षाने दावा केला होता,

### हर्षवर्धन सपकाळ यांची महायुतीवर टीका

विधान परिषद निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून विरोधी पक्षांच्या उमेदवारांना कोट्यवधी रुपयांच्या ऑफर्स दिल्या असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. भाजपाची सर्वत्र सत्ता असतानाही आणखी सत्ता हवी या सत्तेच्या हव्यासापोटी ते लोकशाही मुल्ये पायदळी तुडवत असल्याची टीकाही त्यांनी केली. बुलढाणा येथे माध्यमांशी संवाद साधताना सपकाळ म्हणाले की, लोकसभा आणि विधानसभापाठोपाठ विधान परिषदेच्या निवडणुकीतही सत्ताधारी महायुतीकडून 'पैसा फेक तमाशा देख' असा खेळ खुलेआमपणे सुरू आहे. विरोधी पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज माघारी घ्यावेत यासाठी सत्ताधारी भाजपाने सत्ता पैसा या सर्व तंत्राचा गैरवापर केला आहे. घातपात, विश्वासघात, पैशाचे प्रचंड वाटप करण्यात आले आहे.

# राज्यातील वीज क्षेत्रात मोठा बदल; कृषी ग्राहकांसाठी स्वतंत्र कंपनी

**महाईन्यूज । नागपूर**

**राज्यातील कृषी वीजपुरवठा व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणाऱ्या निर्णयाला महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने हिरवा कंदील दिला आहे. राज्य सरकारने अधिसूचित केलेल्या पुनर्रचना व हस्तांतरण योजनेची आयोगाने अधिकृत नोंद घेत कृषी ग्राहकांना वीजपुरवठा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्वतंत्र शासकीय कंपनीला वितरण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आहे.**



या निर्णयामुळे राज्यातील लाखो कृषी ग्राहकांचा वीजपुरवठा स्वतंत्र व्यवस्थेखाली जाणार असून महावितरणच्या कामकाजातही मोठी पुनर्रचना होणार आहे.

आयोगाने स्पष्ट केले आहे की, कृषी ग्राहकांसाठी वीजपुरवठ्याची जबाबदारी नव्या कंपनीकडे असेल, तर इतर सर्व ग्राहकांना वीजपुरवठा करण्याची जबाबदारी महावितरणकडेच राहणार आहे. सध्या कृषी ग्राहकांना लागू असलेले वीजदर कायम ठेवण्यासही आयोगाने परवानगी दिली आहे.

शेतकरी ग्राहकांसाठी वीजपुरवठा सुरूच राहणार आहे. आयोगाने स्पष्ट केले आहे की, कृषी ग्राहकांच्या सेवेत कोणताही व्यत्यय येणार नाही. उलट कृषी वीजपुरवठा, ऊर्जा वापराचे अचूक लेखांकन आणि सेवा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न या बदलामागे आहे.

आयोगाने नव्या कंपनीला सध्या महावितरणसाठी लागू असलेल्या बहुवर्षीय दर आदेशानुसारच कृषी ग्राहकांना वीजबिले देण्याची परवानगी दिली आहे. स्वतंत्र दर निश्चित होईपर्यंत विद्यमान दरच लागू राहतील. कृषी ग्राहकांशी थेट संबंधित असलेले वीजमीटर आणि अंतिम जोडणीसाठी वापरली जाणारी काही मालमत्ता नव्या कंपनीकडे हस्तांतरित होणार आहे. मात्र मुख्य वितरण यंत्रणा महावितरणकडेच राहणार आहे.

### हा निर्णय नेमका काय आहे?

राज्य सरकारने वीज वितरण व्यवसायाची पुनर्रचना करत कृषी ग्राहकांना वीजपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र शासकीय कंपनीची निर्मिती केली आहे. या योजनेनुसार कृषी वीजपुरवठा महावितरणकडून नव्या कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. या हस्तांतरण योजनेची आयोगाने अधिकृत नोंद घेतली आहे. आयोगाने गेल्या काही वर्षांत महावितरणच्या कामकाजाचा आढावा घेताना कृषी वीजपुरवठा, ऊर्जा लेखांकन, अनुदान व्यवस्थापन आणि वाढता आर्थिक ताण याबाबत चिंता व्यक्त केली होती. कृषी वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र संस्था निर्माण झाल्यास या क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रित करता येईल, अशी भूमिका आयोगाने यापूर्वी अनेक आदेशांतून मांडली होती.

### महावितरणची भूमिका काय?

महावितरणकडे राज्यातील वितरण व्यवस्था, वीज वाहिन्या, उपकेंद्रे आणि वितरणाशी संबंधित बहुतांश मालमत्ता कायम राहणार आहेत. वीज खरेदी, वितरण यंत्रणा चालविणे आणि देखभाल करणे ही कामेही महावितरणकडेच राहतील. मात्र कृषी ग्राहकांना थेट वीजपुरवठा करण्याची जबाबदारी नव्या कंपनीकडे असेल.

# इंडिया आघाडीत फूट? काँग्रेसला धक्का

## ८ जूनच्या बैठकीत सहभागी न होण्याचा DMK चा फायनल निर्णय

महाईन्यूज । नवीदिल्ली

**तमिळनाडूमधील विधानसभेच्या निवडणुकीनंतर अनेक घडामोडी पाहायला मिळाल्या. जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाला काँग्रेसने पाठिंबा देत सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. मात्र, काँग्रेसने डीएमके बरोबरची युती तोडून टीव्हीकेला पाठिंबा दिल्याने डीएमके काँग्रेसवर नाराज झाल्याचं बोललं जात होतं. आता काँग्रेस आणि डीएमकेमधील नाराजी उघडपणे दिसून येत आहे.**



नवी दिल्लीत ८ जून रोजी इंडिया आघाडीची एक महत्वपूर्ण बैठक होणार असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या बैठकीपूर्वी विरोधकांच्या इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला आहे. कारण द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) पक्षाने ८ जूनच्या बैठकीचं निमंत्रण मिळूनही या बैठकीत सहभागी होणार नसल्याचं जाहीर केलं आहे. त्यामुळे इंडिया आघाडीत फूट पडल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

डीएमके पक्षाकडून जारी करण्यात आलेल्या एका निवेदनात म्हटलं की, “लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि राज्यांच्या अधिकारांसाठी हानिकारक मानल्या जाणाऱ्या मुद्द्यांना डीएमके पक्षाने सातत्याने विरोध केला. यामध्ये नीट परीक्षा, मतदारसंघ पुनर्रचना, निवडणुकांपूर्वी मतदार याद्यांची विशेष सखोल पुनर्तपासणी, निवडणूक आयोगाच्या भूमिकेबाबत आवाज उठवणं, एक राष्ट्र, एक निवडणूक प्रस्ताव आणि वक्फ कायदा व परकीय योगदान नियमन कायद्यातील (FCRA) दुरुस्त्या यासह आदी मुद्यांचा समावेश आहे.”

“इंडिया आघाडीच्या स्थापनेपासून डीएमके पक्ष कायम आघाडीबरोबर राहिला आहे. तसेच पक्षाध्यक्ष एम.के. स्टॅलिन यांनी महत्त्वाचे राष्ट्रीय मुद्दे समोर आणण्यात महत्त्वाची भूमिका देखील बजावली आहे. मात्र, तमिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसने केलेल्या कथित ‘विश्वासघातामुळे’ डीएमकेचे कार्यकर्ते दुखावले गेले आहेत. कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर राखत काँग्रेस उपस्थित असलेल्या बैठकीला आम्ही उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतला आहे”, असं डीएमकेने निवेदनात म्हटलं. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे.

तसेच डीएमके पक्षाने हे देखील स्पष्ट केलं की,”आम्ही बैठकीतून माघार घेतली म्हणजे राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवरून माघार घेतली असं अजिबात नाही. नीट, वक्फ कायदा, एक राष्ट्र, एक निवडणूक, एसआयआर आणि इतर सार्वजनिक मुद्द्यांवर आमची भूमिका कायम राहील आणि राष्ट्रीय हिताच्या मुद्द्यांवर इतर मित्रपक्षांना आम्ही पाठिंबा देत राहणार आहोत.” दरम्यान, नवी दिल्लीत ८ जून रोजी होणाऱ्या इंडिया आघाडीच्या या बैठकीला जवळपास १७ विरोधी पक्ष सहभागी होण्याची शक्यता आहे. या बैठकीत देशभरातील अनेक महत्वाच्या मुद्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

### TVK नी राज्यसभेची जागा काँग्रेसला सोडली

तमिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी राज्यातील एकमेव राज्यसभेची जागा काँग्रेसला देण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री जोसेफ यांच्या या घोषणेमुळे काँग्रेसला मोठा फायदा होणार असून, हे पक्षासाठी मोठं यश मानलं जात आहे. टीव्हीकेने राज्यात सर्वाधिक जागा जिंकल्यानंतर निवडणूकपूर्वी डीएमकेबरोबर युतीत असणाऱ्या काँग्रेसने सर्वात पहिल्यांदा जोसेफ यांना सरकार स्थापन करण्यासाठी पाठिंबा दर्शवला होता. राज्यात सरकार स्थीर ठेवण्यासाठी टीव्हीकेसाठी काँग्रेसचा पाठिंबा महत्वाचा आहे.

# ममता बॅनर्जींच्या विरोधात ५९ आमदार कसे गेले?

महाईन्यूज । पश्चिम बंगाल

**पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षात मोठी फूट पडली आहे. ८० आमदारांपैकी जवळपास ५९ आमदार हे ममता बॅनर्जी यांच्या विरोधात गेले आहेत. या ५९ बंडखोर आमदारांच्या गटाला विधानसभेत मान्यता देखील मिळाली आहे. त्यामुळे ममता बॅनर्जी साठी हा मोठा धक्का मानला जात आहे.**




आमदार ऋतब्रता बॅनर्जी आणि आमदार संदीपान साहा यांनी विधानसभेच्या अध्यक्षांकडे त्यांच्या गटाला विरोधी पक्षनेते पद मिळावं अशी मागणी केली होती. तसेच ५९ आमदारांचा पाठिंबा असल्याचं पत्र देखील पश्चिम बंगाल विधानसभेच्या अध्यक्षांना दिलं होतं. त्यानंतर विधानसभेच्या अध्यक्षांनी या ५९ आमदारांच्या गटाला मान्यता देत आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिली.

दरम्यान, पश्चिम बंगालमधील राजकीय घडामोडींबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये फूट का पडली? ममता बॅनर्जी यांच्या विरोधात ५९ आमदार कसे गेले? तृणमूल काँग्रेस पक्षात नेमकं काय घडलं? याबाबत अनेक उलटसुलट चर्चा सुरू आहेत. याबाबत आता आमदार संदीपान साहा यांनी खुलासा करत तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडण्याचं कारण काय? नेमकं काय घडलं? यावर सविस्तर भाष्य केलं आहे.

आमदार ऋतब्रता बॅनर्जी आणि आमदार संदीपान साहा यांनी विधानसभेच्या अध्यक्षांकडे त्यांच्या गटाला विरोधी पक्षनेते पद मिळावं अशी मागणी केली होती. तसेच ५९ आमदारांचा पाठिंबा असल्याचं पत्र देखील पश्चिम बंगाल विधानसभेच्या अध्यक्षांना दिलं होतं. त्यानंतर विधानसभेच्या अध्यक्षांनी या ५९ आमदारांच्या गटाला मान्यता देत आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिली.

### बंडखोरीला सुरूवात कशी झाली?

संदीपान साहा यांनी तृणमूल काँग्रेसमधील बंडखोरीला आणखी एक वाद कारणीभूत असल्याचं सांगितलं. संदीपान साहा यांच्या मते जेव्हा ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या घरी झालेल्या एका सभेत आमदारांना अभिषेक बॅनर्जी यांना ‘स्टँडिंग ओव्हेशन’ देण्यास सांगितलं होतं, तेव्हापासून आमदारांमध्ये नाराजी वाढली होती. मला वाटतं की तिथूनच बंडखोरीला सुरूवात झाली आणि मग ती स्वाक्षरीची घटना घडली. अभिषेक बॅनर्जी यांनी वरिष्ठ नेत्यांना डावललं आणि पक्षांतर्गत लोकशाही कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले”, असं संदीपान साहा यांनी म्हटलं.



## नव्या दिग्दर्शकांसोबत काम करायला आवडतं

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाने स्वतंत्र ओळख निर्माण करणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या तिच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. विविधांगी भूमिका आणि नावीन्यपूर्ण प्रकल्पांसाठी ओळखली जाणारी सई लवकरच आगामी 'तुंबाडची मंजुळा' या चित्रपटात झळकणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटासाठी तिने एका नवोदित दिग्दर्शकासोबत काम केले असून त्याबाबत तिने आपला अनुभव शेअर केला आहे. नव्या दिग्दर्शकांसोबत काम करण्याबाबत बोलताना सई म्हणाली की, एखाद्या व्यक्तीच्या पहिल्या प्रकल्पाचा भाग होणे ही नेहमीच खास भावना असते. जेव्हा ती स्वतः इंडस्ट्रीत नवीन होती, तेव्हा अनेक दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी तिच्यावर विश्वास दाखवला होता. त्यामुळे आता नव्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्याची संधी मिळणे तिच्यासाठी समाधानकारक असल्याचे तिने सांगितले. सईच्या मते, प्रत्येक दिग्दर्शकाची काम करण्याची पद्धत वेगळी असते आणि त्या वेगळ्या अनुभवांतून कलाकार म्हणून अधिक शिकण्याची संधी मिळते. एखाद्या नव्या दिग्दर्शकाच्या स्वप्नवत प्रकल्पाचा भाग होणं हे केवळ काम नसून एक समृद्ध करणारा अनुभव असल्याचेही तिने नमूद केले. तिने पुढे सांगितले की, नव्या कल्पना, नवे दृष्टिकोन आणि नव्या प्रतिभेला पाठिंबा देण्यात एक वेगळेच समाधान असते. त्यामुळे अशा प्रकल्पांमध्ये काम करण्यास ती नेहमीच उत्सुक असते.

# 'लगान' मधून रातोरात स्टार झाली



आमिर खानच्या गाजलेल्या 'लगान' चित्रपटाला २५ वर्षे पूर्ण होत असताना या चित्रपटातील अभिनेत्री ग्रेसी सिंग पुन्हा चर्चेत आली आहे. 'लगान'मध्ये गौरीची भूमिका साकारून प्रेक्षकांची मनं जिंकणारी ग्रेसी सिंग एकेकाळी बॉलिवूडमधील आश्वासक अभिनेत्री मानली जात होती. मात्र, यशाच्या शिखरावर असतानाच तिने चित्रपटसृष्टीपासून दूर जाण्याचा मोठा निर्णय घेतला. ग्रेसी सिंगने १९९७ मध्ये 'अमानत' या दूरदर्शन मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर १९९९ मध्ये 'सुंदरी बहू' या बंगाली चित्रपटातून ती मोठ्या पडद्यावर झळकली. मात्र, तिच्या कारकिर्दीला खरी ओळख मिळाली ती २००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या लगान या चित्रपटामुळे. या चित्रपटाला ऑस्कर पुरस्कारांसाठी नामांकन मिळाले होते, तर ग्रेसी सिंगला या चित्रपटासाठी फिल्मफेअरच्या सर्वोत्तम पदार्पण अभिनेत्री पुरस्काराचे नामांकन मिळाले होते. यानंतर तिने 'मुन्नाभाई एमबीबीएस' आणि 'गंगाजल' यांसारख्या यशस्वी चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या. मात्र, सुरुवातीच्या यशानंतर तिची कारकीर्द अपेक्षित वेगाने पुढे जाऊ शकली नाही. हळूहळू ती मुख्य प्रवाहातील चित्रपटांपासून दूर गेली ती कायमचीच. ग्रेसी सिंग शेवटची 'संतोषी माँ- सुनिये व्रत कथाएं' या मालिकेत दिसली होती. या मालिकेत तिने संतोषी माताची भूमिका साकारली होती. त्यानंतर तिने मनोरंजन क्षेत्राला रामराम केला. ग्रेसी सिंग ४५ वर्षांची झाली असून अजूनही अविवाहित आहे. तिने आध्यात्मिक जीवनाची कास धरली आहे. ब्रह्मकुमारी संस्थेशी जोडल्यापासून तिने चित्रपट आणि मालिकांपासून स्वतःला दूर ठेवले आहे. सोशल मीडियावरही ती फारशी सक्रिय नसल्याने तिचे सार्वजनिक आयुष्यातील दर्शन क्वचितच घडते. एकेकाळी रुपेरी पडद्यावर चमकणारी ही अभिनेत्री आज आध्यात्मिक जीवनाचा मार्ग स्वीकारून जीवन जगत आहे.

# 'बजरंगी भाईजान'मधील 'मुन्नी' झाली 18 वर्षांची



बॉलिवूडमधील सुपरहिट चित्रपट 'बजरंगी भाईजान'मधून प्रेक्षकांच्या मनात घर करणारी लहानगी मुन्नी आजही अनेकांच्या आठवणीत आहे. या चित्रपटात मुन्नीची भूमिका साकारणारी अभिनेत्री हर्षाली मल्होत्रा आता 18 वर्षांची झाली आहे. तिच्या 18व्या वाढदिवसानिमित्त तिने सोशल मीडियावर काही खास छायाचित्रे शेअर केली असून ती सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. 2015 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बजरंगी भाईजान' चित्रपटात हर्षालीने मुन्नीची भूमिका साकारली होती. त्या वेळी ती अवघ्या सात वर्षांची होती. संवाद न बोलताही केवळ तिच्या निरागस चेहऱ्याने आणि प्रभावी अभिनयाने तिने प्रेक्षकांची मने जिंकली होती. सलमान खानसोबत तिची ऑनस्क्रीन केमिस्ट्रीही प्रेक्षकांना खूप आवडली होती. आता तब्बल 11 वर्षांनंतर हर्षालीचा लूक पूर्णपणे बदलला आहे. ती आता तरुणी झाली असली तरी तिच्या चेहऱ्यावरील निरागसपणा आणि गोड हास्य आजही कायम असल्याचे चाहते म्हणत आहेत. हर्षालीने तिच्या 18व्या वाढदिवसाचे फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. या छायाचित्रांमध्ये ती वाढदिवसाचा केक हातात धरून आनंदी मूडमध्ये दिसत आहे. बेबी पिंक रंगाचा आकर्षक ड्रेस परिधान केलेल्या हर्षालीचा साधा आणि सुंदर लूक चाहत्यांना विशेष आवडला आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने तिने एक भावनिक पोस्टही शेअर केली. या पोस्टमध्ये तिने आपल्या आयुष्यातील नव्या टप्प्याबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. "आयुष्याचे 18वे पर्व सुरू झाले आहे. आता मी अधिकृतपणे सज्ञान झाले आहे. मात्र अजूनही आयुष्य समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे. नवीन सुरुवात, मोठी स्वप्ने आणि कायम लक्षात राहणाऱ्या आठवणींसाठी हा खास क्षण आहे," असे तिने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. तिच्या या पोस्टवर चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. अनेकांनी तिच्या नव्या लूकचे कौतुक करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. काहींनी 'मुन्नी आता खूप मोठी झाली' अशा प्रतिक्रिया दिल्या, तर अनेकांनी तिच्या चेहऱ्यावरील निरागसपणा आजही तसाच असल्याचे म्हटले. 'बजरंगी भाईजान' या चित्रपटामुळे हर्षालीला देशभरात मोठी लोकप्रियता मिळाली होती.



# भारतीय संघाला मोठा धक्का!

## विराट कोहली अफगाणिस्तानविरूद्ध वनडे मालिकेतून बाहेर

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील मालिकांना लवकरच सुरू होणार आहेत. पहिला कसोटी सामना ६ जून रोजी सुरू होईल. त्यानंतर १३ जूनपासून तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू होईल. बीसीसीआयने आयपीएल सुरू असतानाच या दोन्ही मालिकांसाठी भारतीय संघाची घोषणा आधीच केली आहे. दरम्यान, अचानक एक मोठी बातमी समोर आली आहे. भारतीय संघाचा स्टार खेळाडू, विराट कोहली वनडे मालिकेतून बाहेर पडला असल्याचं समोर आलं आहे.**



### भारताचा संघ :

शुबमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली (दुखापत) श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), हार्दिक पांड्या, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, प्रसिध कृष्णा, प्रिन्स यादव, गुरनूर ब्रार, हर्ष दुबे.

विराट कोहली बऱ्याच कालावधीनंतर टीम इंडियाकडून खेळण्याची तयारी करत होता. मात्र, कोहली आणि त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. आता विराट कोहली हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. काही दिवसांपूर्वी विराट कोहली आयपीएलमध्ये आरसीबीकडून खेळत होता. गुजरात टायटन्सविरुद्धच्या अंतिम सामन्यात कोहलीने नाबाद ७५ धावांची एक शानदार खेळी केली आणि षटकार मारून आपल्या संघाला सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन बनण्यास यशस्वीरित्या मदत केली.

आरसीबी आणि गुजरात टायटन्स यांच्यातील फायनलमध्ये फलंदाजी करत असताना विराट कोहलीला दुखापतीची त्रास जाणवत होता. सामन्यादरम्यान बऱ्याच वेळेस फिजिओ विराटच्या दुखापतीसाठी मैदानात आलेले पाहायला मिळालं. यानंतर आता विराट दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर झाल्याचे रिपोर्ट समोर येत आहेत.

आयपीएल २०२६ चं आरसीबीला जेतेपद पटकावून दिल्यानंतर विराट कोहली पत्नी अनुष्का शर्मासह वृंदावनला पोहोचला होता. वृंदावनमध्ये दोघांनीही प्रेमानंद महाराजांचं दर्शन घेतलं. यादरम्यान विराट कोहली राधे राधे बोलतानाचा व्हीडिओदेखील समोर आला होता. याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. यानंतर विराट कोहलीचा एअरपोर्टवरील व्हीडिओदेखील समोर आला होता. त्याच्या टीशर्टने यादरम्यान सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं.

### भारत-अफगाणिस्तान वनडे मालिकेचं वेळापत्रक

पहिला एकदिवसीय: १३ जून – धर्मशाला
दुसरा एकदिवसीय: १७ जून – लखनौ
तिसरा एकदिवसीय: २० जून – चेन्नई

# गौतम गंभीर व निवडकर्त्यांमध्ये टी-२० कर्णधारपदावरून मतभेद

**महाईन्यूज** । मुंबई

**सूर्यकुमार यादवला भारताच्या टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून काढण्यात आलं आहे. सूर्याला पदावरून पायउतार करण्यासाठी कर्णधारपद हा कधीच मुख्य मुद्दा नव्हता. मात्र, गेल्या बराच काळ टी-२० क्रिकेटमधील घसरती कामगिरी पाहता निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाचा संयम संपल्याचं दिसत आहे. सूर्यकुमार यादव याला भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून हटवण्यात येणार असून, सुमारे १८ महिन्यांच्या निराशाजनक कामगिरीनंतर त्याचे संघातील स्थानही धोक्यात आलं आहे. पण आता पुढचा कर्णधार कोण यावर निवड समिती व गौतम गंभीर यांच्यात द्वंद्व असल्याचं समोर येत आहे.**



### संजू सॅमसनला कर्णधार करण्याचा प्रस्ताव..

बीसीसीआयच्या एका सूत्राने पीटीआयला सांगितलं, "तिलक वर्माला श्रीलंकेत होणाऱ्या 'अ' संघाच्या मालिकेसाठी कर्णधार बनवण्यात आले आहे. त्याच्या नेतृत्वगुणांची चाचणी घेण्याचा हा प्रयत्न आहे." मात्र, रिपोर्ट्सनुसार गंभीरची पहिली पसंती संजू सॅमसन आहे. यंदाच्या टी-२० विश्वचषकात संजूने शानदार कामगिरी केली होती. स्पर्धेदरम्यान संघात संधी मिळाल्यानंतर त्याने अवघ्या पाच डावांत ३२१ धावा केल्या. त्याची सरासरी ८०.२५ तर स्ट्राईक रेट १९९.३७ इतका होता. विशेष म्हणजे, बाद फेरीतील सलग तीन सामन्यांत त्याने अर्धशतकं झळकावत भारताच्या विजेतेपदाच्या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली होती.

रिपोर्ट्सनुसार श्रेयस अय्यर हे या पदासाठी सर्वात मजबूत दावेदार मानला जात आहे. डिसेंबर २०२३ नंतर त्याने भारतीय टी-२० संघाकडून एकही सामना खेळलेला नसला, तरी त्यांच्या नेतृत्वगुणांची सातत्याने चर्चा होत आहे. गेल्या तीन आयपीएल हंगामांत अय्यरने दोन वेगवेगळ्या संघांना अंतिम फेरीत पोहोचवलं आहे. यामध्ये २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सला विजेतेपद मिळवून देण्याचाही समावेश आहे. त्यामुळे कर्णधारपदाच्या शर्यतीत त्याचा दावा अधिक मजबूत मानला जात आहे.

मात्र, भारतीय टी-२० संघाच्या नेतृत्वाचा निर्णय इतका सोपा नसल्याचेही मानले जात आहे. निवडकर्त्यांसमोर अनेक पर्याय उपलब्ध असून, आगामी काळात कोणाच्या खांद्यावर नेतृत्वाची जबाबदारी सोपवली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काही रिपोर्ट्सनुसार, भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हे श्रेयस अय्यर याला टी-२० संघाचे पुढील कर्णधार बनवण्याबाबत पूर्णपणे खात्रीशीर नाहीत.

गौतम गंभीर आणि श्रेयस अय्यर हे २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सच्या ताफ्याचा भाग होते. त्या वेळी गंभीर संघाचे मार्गदर्शक (मेंटॉर) होते, तर अय्यरने संघाला विजेतेपद मिळवून दिलं होतं. मात्र, विजेतेपदानंतरही आपल्या योगदानाला पुरेसे महत्त्व मिळाले नसल्याची भावना अय्यरने सार्वजनिकपणे व्यक्त केली होती. दरम्यान, भारतीय टी-२० संघाच्या कर्णधारपदासाठी आणखी एक मजबूत दावेदार म्हणून तिलक वर्मा याचे नाव समोर येत आहे. निवड समितीतील अनेक सदस्यांचा त्याला पाठिंबा असल्याचं म्हटलं जात आहे. त्याचे कमी वय आणि दीर्घकालीन नेतृत्वाची क्षमता लक्षात घेता तो भविष्यासाठी योग्य पर्याय असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। शुक्रवार ।
दि. 05 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ७ जुलैला तुकोबांची पालखी पंढरीच्या वाटेवर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

श्रीक्षेत्र देहू येथील श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने यंदाच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याचे वेळापत्रक बुधवारी जाहीर करण्यात आले. यंदा ७ जुलै रोजी आषाढ पौर्णिमेला संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून १७ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी पालखी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल होणार आहे.

संस्थानने यंदाच्या पालखी सोहळ्याची जबाबदारी विश्वस्त विक्रमसिंह उमराज मोरे-देहूकर, उमेश सुरेश मोरे आणि लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांच्यावर सोपविली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली यंदाचा सोहळा पार पडणार आहे. पालखीचा परतीचा प्रवास २९ जुलैपासून सुरू होणार असून ९ ऑगस्ट रोजी एकादशीच्या दिवशी पालखीचे श्रीक्षेत्र देहू येथे आगमन होईल. गतवर्षीच्या वारी सोहळ्यात ३९५ दिंड्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी ३० दिंड्या पालखी रथाच्या पुढे, तर उर्वरित दिंड्या रथामागे सहभागी झाल्या होत्या.

वारकरी संप्रदायातील या पालखी सोहळ्याला साडेतीनशे वर्षांहून अधिक परंपरा लाभली आहे. संत तुकाराम महाराजांचे तृतीय चिरंजीव तपोनिधी नारायण महाराज यांनी सन १६८५ मध्ये या सोहळ्याची मुहूर्तमेढ रोवली. पुढे १८३२ पासून संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या स्वतंत्रपणे पंढरपूरकडे मार्गस्थ होऊ लागल्या.

दरम्यान, यंदाच्या सोहळ्यासाठी संस्थानतर्फे चौघडा गाडीसाठी तीन नवीन बैलजोड्या खरेदी करण्यात येणार आहेत. तसेच नवीन चांदीचा पालखी रथ तयार करण्याचे कामही सुरू असून तो प्रस्थानापूर्वी पूर्ण करण्याचा मानस आहे. या उपक्रमासाठी भाविकांनी चांदी अथवा आर्थिक स्वरूपात देणगी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.


### तीन बैलजोड्या विकत घेणार

यंदाच्या सोहळ्यासाठी संस्थानतर्फे चौघडा गाडीसाठी तीन बैलजोड्यांची खरेदी करण्यात येणार असून, नवीन चांदीचा पालखी रथ तयार करण्याचे कामही सुरू आहे. हा रथ प्रस्थानापूर्वी पूर्ण करण्याचा मानस असून, भाविकांनी चांदी अथवा आर्थिक स्वरूपात देणगी देऊन या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ऑनलाइन कर भरण्याकडे नागरिकांचा वाढता कल!

## २ लाख ४९ हजार नागरिकांनी घेतला १० टक्के सवलतीचा लाभ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत चालू आर्थिक वर्ष (२०२६-२७) मध्ये मालमत्ता कर संकलन मोहिमेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, दि. १ एप्रिल २०२६ ते ४ जून २०२६ दुपारी २:३० वाजेपर्यंत २८९ कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता कर संकलित करण्यात आला आहे. यामुळे यंदाच्या आर्थिक वर्षातील कर संकलन मोहिमेला सकारात्मक सुरुवात झाल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत शहरातील २ लाख ७८ हजार १७ अधिक मिळकतधारकांनी आपल्या मालमत्तेचा कर भरला आहे, अशी माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.**



> पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मालमत्ता कर हा शहराच्या विकासाचा महत्त्वाचा आर्थिक स्रोत असून, नागरिकांनी वेळेत कर भरल्यास शहरातील पायाभूत सुविधा, रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि नागरी सेवांच्या गुणवत्तेमध्ये अधिक सुधारणा करण्यास मदत होते. महापालिकेकडून विविध सवलती देण्यात येत असून, नागरिकांनी ३० जूनपूर्वी मालमत्ता कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

महापालिकेकडून मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती जाहीर करण्यात आल्या असून, विशेषतः ३० जूनपूर्वी कर भरणाऱ्या नागरिकांना देण्यात येणाऱ्या सवलतींना मोठा प्रतिसाद मिळत आहे. ऑनलाइन पद्धतीने कर भरणाऱ्या नागरिकांना १० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात असल्याने डिजिटल व्यवहारांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत २ लाख ४९ हजार १४३ नागरिकांनी ऑनलाइन माध्यमातून मालमत्ता कर भरून सवलतीचा लाभ घेतला आहे. या माध्यमातून २६५ कोटी ८६ लाख रुपयांहून अधिक मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला असून, नागरिकांचा डिजिटल व्यवहारांकडे वाढता कल अधोरेखित होत आहे.

पिंपरी चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या मालमत्ता तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या सर्व मालमत्ताधारकांना चालू आर्थिक वर्षाचे कर देयक वेळेत प्राप्त व्हावे, यासाठी कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत व्यापक स्तरावर नियोजन करण्यात आले होते. विशेषतः महिला बचत गटांच्या माध्यमातून घरपोच मालमत्ता कर बिल वाटप मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली असून, त्यामुळे नागरिकांना वेळेत कर देयके उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

महापालिकेकडून कर वसुली अधिक प्रभावी करण्यासाठी थकबाकीदारांविरोधातही कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या मिळकतधारकांविरोधात जप्तीपूर्वीची नोटीस बजावण्याची मोहीम हाती घेण्यात आली असून, आतापर्यंत ३५ हजारांहून अधिक थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटिसांचे वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित थकबाकीदारांनी तातडीने मालमत्ता कर भरून पुढील प्रशासकीय कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

महापालिकेकडून महिलांच्या नावावरील निवासी मालमत्ता, दिव्यांग व्यक्तीच्या नावावर असलेले मिळकतधारक तसेच पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या निवासी गृहनिर्माण संस्थांसाठी विविध प्रकारच्या सवलती लागू करण्यात आल्या आहेत. विशेषतः महिलांच्या नावावर एकमेव निवासी मालमत्ता असल्यास ३० टक्क्यांपर्यंत सवलतीचा लाभ मिळत असून, नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संजयनगर, फुगेवाडी येथील झोपडपट्टीतील विनापरवाना झोपडीवर निष्कासन कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन विभागाच्या वतीने 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या सहकार्याने संजयनगर, फुगेवाडी येथील झोपडपट्टीतील विनापरवाना झोपडीवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या संयुक्त कारवाईमध्ये सुमारे ८७५ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत झोपडीचे बांधकाम निष्कासित करण्यात आले.**





> महानगरपालिकेच्या जागेवर अथवा झोपडपट्टी क्षेत्रात कोणतेही अनधिकृत बांधकाम करणे हे पूर्णतः नियमबाह्य आहे. अशा प्रकारची बांधकामे सुरू केल्यास अथवा उभारल्यास त्यावर कायद्यानुसार निष्कासन कारवाई करण्यात येईल. शहरातील पुनर्वसन प्रक्रिया आणि नियोजित विकासाला बाधा आणणाऱ्या कोणत्याही अनधिकृत संरचनेबाबत महानगरपालिका कठोर भूमिका घेणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणतेही अनधिकृत बांधकाम करू नये व सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करावे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली, उप आयुक्त अण्णा बोदडे व कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान कार्यकारी अभियंता उमेश मोने, उपअभियंता संदिप पाडवी, महेंद्र देवरे, प्रशांत कोतकर, सुनिल दांगडे, सुनिल हरिदास तसेच कनिष्ठ अभियंते सतीश डांगे, अशोक पाटील, वनिता बवले, योगेश शेवलकर, विशाल नेवाळे, सुरेश लंगोटे, कल्याणी वाघमारे, धनश्री हंडे, ज्योती चांदगुडे, प्रीती बिजवे यांच्यासह बीट निरीक्षक व अतिक्रमण पथक सहभागी होते. तसेच ह क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, २० एमएसएफ जवान यांच्या उपस्थितीत तसेच ०४ ब्रेकर, ०२ गॅस कटर व सुमारे ४० मजुरांच्या सहाय्याने ही कारवाई पार पडली.

यादरम्यान, घटनास्थळी पोलीस आयुक्त विजयकुमार चौबे यांनी देखील भेट देऊन पाहणी केली आणि कारवाईचा आढावा घेतला. कारवाईदरम्यान पोलीस उपायुक्त संदिप आटोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरख कुंभार, १० पोलीस अधिकारी व ५० पोलीस अंमलदार यांच्या चोख बंदोबस्तात ही निष्कासन कारवाई यशस्वीरीत्या पार पडली.

# डॉ. आबाजी माने यांना राष्ट्रीय बीच टेनिस स्पर्धेत सुवर्णपदक!

## क्रीडा विश्व : डी. वाय. पाटील कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालकांची कामगिरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**गोव्यातील मोर्जीम येथे २९ आणि ३० जुलै दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'भारतीय बीच टेनिस महासंघाच्या' राष्ट्रीय बीच टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत आकुर्डी येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे (DYPCOE) शारीरिक शिक्षण संचालक (PHYSICAL EDUCATION DIRECTOR) डॉ. आबाजी सुबराव माने यांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. डॉ. माने यांनी या राष्ट्रीय स्पर्धेतील खुल्या गटाच्या (OPEN CATEGORY) एकेरी स्पर्धेत अव्वल स्थान पटकावत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.**



विद्यार्थ्यांना खेळाचे धडे देणाऱ्या एका शिक्षकानेच राष्ट्रीय स्तरावर ही दैदिप्यमान कामगिरी केल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांतील अव्वल आणि नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या कड्या आव्हानांचा सामना करत डॉ. आबाजी माने यांनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या, प्रदीर्घ अनुभवाच्या आणि जिद्दीच्या जोरावर प्रत्येक सामन्यात प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. अंतिम सामन्यात त्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक जिंकले आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी यशाबद्दल डॉ. आबाजी माने यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा क्षेत्रातील खालील प्रमुख मान्यवर उपस्थित होते:श्री. प्रभज्योत गिल (अध्यक्ष, भारतीय बीच टेनिस महासंघ) श्री. मुशाहिद खान (तांत्रिक सचिव, भारतीय बीच टेनिस महासंघ) श्री. माधव चितळे (अध्यक्ष, महाराष्ट्र बीच टेनिस असोसिएशन) श्री. सुभाष उरकुडे (सरचिटणीस, महाराष्ट्र बीच टेनिस असोसिएशन).

### विद्यार्थ्यांसाठी ठरले प्रेरणास्थान

डॉ. आबाजी सुबराव माने यांनी स्वतः मैदानात उतरून मिळवलेले हे यश डी. वाय. पाटील कॉलेजमधील व महाराष्ट्रातील युवा खेळाडूंसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले आहे. "शिक्षकाने स्वतः कृतीतून आदर्श निर्माण केला की विद्यार्थ्यांना त्यातून मोठी ऊर्जा मिळते," अशा शब्दांत क्रीडाप्रेमींनी त्यांच्या कामगिरीचा गौरव केला. राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे (DYPCOE) नाव उज्ज्वल करणाऱ्या डॉ. आबाजी माने यांचे डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पीसीयुची औद्योगिक विद्यापीठाच्या दिशेने वाटचाल : कुलपती हर्षवर्धन पाटील

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारत आणि दक्षिण कोरिया यांच्या मध्ये आर्थिक, औद्योगिक संबंध आणखी मजबूत आणि वृद्धिंगत होण्यासाठी पीसीयू आणि कोसमे यांच्या मध्ये झालेला सामंजस्य करार हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारतामध्ये कोरियातील लघु व मध्यम उद्योगांना सक्षम करण्यामध्ये कोसमे ची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. पीसीयू मध्ये कोसमे पुणे बेस कॅम्प हे देशातील एकमेव आहे. याचा उपयोग कोरियन भाषा प्रशिक्षण, प्राध्यापक देवाणघेवाण कार्यक्रम, विद्यार्थी कौशल्य विकास, संशोधन, स्टार्टअप इनक्युबेशन, कोरियन एसएमइ साठी उत्पादन चाचणी सुविधा आणि उद्योग शैक्षणिक सहकार्य असे विविध उपक्रम पीसीयू मध्ये सुरु करण्यासाठी होईल. यासाठी कोरियन सरकार देखील सकारात्मक आहे असे कोरिया प्रजासत्ताक महावाणिज्य दूत डोंगवान यू यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे कोरिया एसएमइ स्टार्टअप एजन्सी (कोसमे) यांच्या संयुक्त विद्यमाने देशातील पहिल्या "कोसमे पुणे बेस कॅम्प"चे उद्घाटन कोरिया प्रजासत्ताक महावाणिज्य दूत डोंगवान यू आणि पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, प्रादेशिक संचालक, विभागीय संचालक ईशान्य आशिया आणि एशियन कोसमे सुसोक पार्क, व्यवस्थापकीय संचालक कोसमे जीबीसी नवी दिल्ली जेक्यॉन्ग ली, मुख्य व्यापार प्रतिनिधी किटा योंग यून, संचालक सीईपीए नवी दिल्ली सेउंग्चांग हा, कार्यकारी संचालक पीसीईटी डॉ. गिरीश देसाई, पीसीयूचे कुलगुरू संतोष सोनवणे, स्टाराजीन कंपनीच्या सीईओ युजिन हान, पीसीयू अधिष्ठाता डॉ. रामदास बिरादार, कुलसचिव डॉ. अनिल माहेश्वरी तसेच कोरियन कंपन्यांचे अधिकारी, प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

पीसीयूमध्ये आयोजित 'कोरिया बिझनेस कल्चर प्रोग्राम' या सहा आठवड्यांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांचे सादरीकरण केले. यामध्ये विद्यार्थ्यांना कोरियन व्यावसायिक संस्कृती, कार्यपद्धती, उद्योग, अपेक्षा आणि जागतिक करिअरच्या संधींबाबत प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण देण्यात आले होते.

प्रास्ताविक डॉ. रामदास बिरादार यांनी केले. सूत्र संचालन स्टाराजीन कंपनीच्या सीईओ युजिन हान यांनी केले. आभार डॉ. अनिल माहेश्वरी यांनी मानले.

### नव्या संधी निर्माण...

स्वागत करताना कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, पीसीयू मध्ये उद्योगाभिमुख शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), क्वांटम तंत्रज्ञान आणि इंडस्ट्री ४.० यांवर विशेष भर दिला जातो. कोसमे पुणे बेस कॅम्प हे कोरियन उद्योग आणि भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेमधील दुवा म्हणून कार्य करणार असून यामुळे उद्योग, रोजगार क्षेत्रासाठी नव्या संधींची दारे खुली होणार आहेत असे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले. स्टाराजीन कंपनीच्या सीईओ युजिन हान यांनी कोसमे आणि पीसीयू यांच्यातील सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या पहिल्या सामंजस्य करारापासून विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, एमआयडीसी सोबतचे संवाद, पुण्यातील कोरियन उद्योगांशी झालेल्या चर्चा आणि नवी दिल्ली येथे झालेला करार याची माहिती दिली.

### उद्योग रोजगारासाठी चालना...

एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी अधिकारी नितीन गवळी यांनी कोसमे पुणे बेस कॅम्पच्या स्थापनेमुळे महाराष्ट्र हे कोरियन गुंतवणूक आणि उद्योग विस्तार, रोजगारासाठी चालना मिळेल. एमआयडीसी या केंद्राशी संबंधित कोरियन कंपन्यांना सर्वतोपरी सहकार्य करेल असे सांगितले. सुसोक पार्क यांनी सांगितले की, पुणे हे ऑटोमोबाईल, अभियांत्रिकी आणि नवोन्मेष क्षेत्रातील अग्रगण्य केंद्र म्हणून उदयास येत आहे. या माध्यमातून कोरियन उद्योगांना सक्षम करण्यासाठी आणि नवीन सहकार्याच्या संधी निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू असे सांगितले.

# डी. वाय. पाटील कॉलेजच्या सार्थक आणि शनायुची सुवर्ण भरारी!

## क्रीडा विश्व : राष्ट्रीय बीच टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राला सुवर्णपदक!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**गोव्यातील मोर्जीम येथे २९ आणि ३० जुलै दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'भारतीय बीच टेनिस महासंघाच्या' राष्ट्रीय बीच टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पिंपरी-चिंचवडमधील खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आकुर्डी येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे (DYPCOE) विद्यार्थी सार्थक आंभोरे आणि शनायु पाटील यांनी वरिष्ठ दुहेरी गटात (SENIOR DOUBLES) उत्कृष्ट कामगिरी करत देशात अव्वल स्थान पटकावले आणि सुवर्णपदकावर नाव कोरले.**



या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांच्या नामांकित संघांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक सामन्यात सार्थक आणि शनायु या जोडीने उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, कमालीची जिद्द आणि अप्रतिम संघभावनेचे प्रदर्शन घडवले. राष्ट्रीय स्तरावरील तगड्या आव्हानांना धैर्याने तोंड देत त्यांनी अंतिम सामन्यात विजय मिळवला आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या उल्लेखनीय आणि दैदिप्यमान यशाबद्दल दोन्ही खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा क्षेत्रातील खालील प्रमुख मान्यवर उपस्थित होते: श्री. प्रभज्योत गिल (अध्यक्ष, भारतीय बीच टेनिस महासंघ) श्री. मुशाहिद खान (तांत्रिक सचिव, भारतीय बीच टेनिस महासंघ) श्री. माधव चितळे (अध्यक्ष, महाराष्ट्र बीच टेनिस असोसिएशन) श्री. सुभाष उरकुडे (सरचिटणीस, महाराष्ट्र बीच टेनिस असोसिएशन)

### मार्गदर्शकांचा मोलाचा वाटा

सार्थक आणि शनायु यांच्या या यशामागे त्यांचे प्रशिक्षक डॉ. आबाजी सुबराव माने यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. डॉ. माने यांनी घेतलेले कडक परिश्रम, योग्य रणनीती आणि दिलेल्या प्रेरणेमुळेच खेळाडूंना हे यश संपादन करता आले, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राची आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंगची (DYPCOE) मान अभिमानाने उंचवणाऱ्या सार्थक आंभोरे आणि शनायु पाटील या दोन्ही खेळाडूंचे शिक्षण संस्था, क्रीडा क्षेत्र आणि सर्व स्तरातून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# Priyadarshani school Moshi-Creative and Critical Thinking Training for Teachers (Grade III to Grade VIII)

**MAHAENEWS I PIMPRI-CHINCHWAD**

**Priyadarshani School, Moshi (CBSE-CBP) successfully organized a comprehensive training programme on Creative and Critical Thinking for teachers of Grades III to VIII on 2nd and 3rd June 2026. The session aimed at enhancing educators' ability to foster analytical, innovative, and problem-solving skills among students.**




The training emphasized learner-centered teaching methodologies, inquiry-based learning, and strategies to encourage higher-order thinking in classrooms. Teachers actively participated in discussions, group activities, and practical exercises designed to strengthen classroom engagement and creativity.

The programme was conducted by esteemed CBP Resource Persons Ms. Swati A. Kanase and Mr. Sawant Darshan G., who shared valuable insights and best practices aligned with the National Education Policy (NEP) and CBSE guidelines. The interactive session empowered teachers with effective tools to create dynamic learning environments and nurture independent thinking among students. The management and staff of Priyadarshani School expressed their appreciation for the enriching training and reaffirmed their commitment to continuous professional development and academic excellence.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE